follow us : /rajdandlive

२५ वर्षे विश्वासार्हतेची

मराठी माणसाचा मानदंड

# राजदंड

www.rajdand.com

। पश्चिम महाराष्ट्र ।

RNI Regd No.७२१०५/९९ * वर्ष २५ * अंक ३०६ सातारा * रविवार दि ४ ऑगस्ट २०२४ * पाने ८ * किंमत ५ रू/

## पुणे- बंगळुरू राष्ट्रीय महामार्गावरील खड्ड्यांविरोधात काँग्रेसचे चार टोल नाक्यांवर आंदोलन सुरू

# आनेवाडी टोल नाका काँग्रेस कार्यकर्त्यांनी रोखला

### भर पावसात प्रचंड घोषणाबाजी

**सातारा :** आनेवाडी टोलनाक्यावर भर पावसात काँग्रेस जिल्हाध्यक्ष डॉक्टर सुरेश जाधव यांच्या नेतृत्वाखाली सुमारे २०० कार्यकर्त्यांनी टोलनाका रोखो आंदोलन करत टोल भरू देण्यास प्रतिबंध केला .रस्ताच नाही जाग्यावर तर टोल का भरायचा ? असा रोखठोक सवाल करत वाहने टोल शिवाय जाऊ देण्यास प्रारंभ केल्याने काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते टोल नाक्यावर काँग्रेस कार्यकर्त्यांनी सुमारे अर्धा तास आंदोलन केले टोल नाक्यावर सुमारे पंधरा मिनिटे वाहनांच्या रांगा लागल्या होत्या पोलिसांनी हस्तक्षेप करत आंदोलकांना तातडीने ताब्यात घेतले.

पश्चिम महाराष्ट्रामध्ये आनेवाडी तासवडे या सातारा जिल्ह्यातील दोन टोल नाक्यावर काँग्रेसने आज मोर्चे बांधणी करत जोरदार आंदोलन केल .काँग्रेसचे कराड उत्तरचे आमदार पृथ्वीराज चव्हाण तर आणेवाडी टोल नाक्यावर काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष डॉक्टर सुरेश जाधव यांनी आंदोलन केले या आंदोलनामध्ये सातारा जिल्ह्यातील सुमारे २०० हून अधिक आंदोलन सहभागी झाले होते सकाळी नऊ वाजल्यापासूनच आनेवाडी टोलनाक्यावर काँग्रेस कार्यकर्त्यांची गर्दी व्हायला सुरुवात झाली होती .साडेनऊच्या दरम्यान डॉक्टर सुरेश जाधव आणि त्यांचे सहकारी रस्ताच नाही जागेवर टोल का भरायचा असे फलक घेऊन टोलनाका परिसरात अवतरले . आणि रस्त्यावर प्रचंड खड्डे पडलेले असताना घेतला जाणारा टोल ही सक्तीची वसुली आहे असा आरोप डॉक्टर सुरेश जाधव यांनी केला .त्यांनी व्यवस्थापनाच्या कर्मचाऱ्यांना टोल वसुली प्रतिबंध केला त्यामुळे थोडा वेळ गोंधळाचे वातावरण तयार झाले .काँग्रेस



कार्यकर्त्यांनी टोल नाक्यावरच ठाण मांडत वाहने टोल शिवाय जाऊ दिली त्यामुळे वाहन चालकांचा चांगला फायदा झाला .

मात्र काँग्रेसच्या या आंदोलनामुळे रस्त्याच्या दोन्ही बाजूला वाहनांच्या रांगा लागल्या होत्या टोल नाक्यावर काँग्रेसचे आंदोलन लक्षात घेता तगडा पोलीस बंदोबस्त तैनात होता तरीसुद्धा काँग्रेस कार्यकर्त्यांनी त्याची तमा न बाळगता आपल्या आंदोलन सुरूच ठेवले डॉक्टर सुरेश जाधव म्हणाले राज्य सरकार सामान्यांच्या प्रश्नाकडे वारंवार दुर्लक्ष करत आहे राज्यात महागाई वाढलेली असताना पायाभूत सुविधांकडे

मात्र दुर्लक्ष होत आहे .सातारा जिल्ह्यामध्ये पावसामुळे पुणे बेंगलोर महामार्गाची अत्यंत दयनीय अवस्था झाली असून शेंद्रे ते कागल हा रस्ता अद्याप सहा पदरीकरणाच्या निमित्ताने पूर्ण झालेला नाही रिलायन्स इन्फ्रा या कंपनीकडून या कामांमध्ये वारंवार टोलवाटोलवी केली जात आहे

# खेड शिवापूर टोल नाक्यावर काँग्रेसचं जोरदार आंदोलन

**भोर :** पुणे- बंगलोर महामार्गाची दयनीय अवस्था झाल्याच्या पार्श्वभूमीवर शिंदेवाडी ते कोल्हापूरपर्यंतच्या विविध टोलनाक्यावर काँग्रेस पक्षाच्या वतीने आज शनिवार (दि.३) रोजी आंदोलन करण्यात आले. त्याचप्रमाणे खेडशिवापूर (ता. हवेली) येथील टोलनाक्यावर भोरचे आमदार संग्राम थोपटे व पुरंदरचे आमदार संजय जगताप यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन करण्यात आले. यावेळी खेड शिवापूर टोलनाक्यावर सकाळी दहा वाजल्यापासूनच कार्यकर्त्यांची मोठी फौज जमा झाली होती.



पुणे-सातारा महामार्गाची खड्ड्यांमुळे झालेली दूरवस्था कित्येकांच्या जीवावर बेतली असून दुरुस्ती न करता देखील त्याकडे दुर्लक्ष करून राजरोसपणे टोल वसूल करणाऱ्या महामार्ग प्राधिकरण व टोल प्रशासना चा आज खेड शिवापूर टोल नाक्यावर टोल बंद आंदो लन करून जोरदार निषेध करण्यात आला.

यावेळी टोलचा झोल बंद करा, महामार्गाची दुरुस्ती झालीच पाहिजे,खेड शिवापूर टोल बंद झालाच पाहिजे, अशा घोषणा देत टोल नाक्यावरून जाणारी सर्व वाहने मोफत सोडून देत टोलनाका वसुली जोपर्यंत थांबवत नाही, तोपर्यंत आंदोलन सुरूच ठेवणार असल्याचा पवित्रा घेत काँग्रेस पक्षाच्या वतीने टोलनाक्यावर तीव्र आंदोलन सुरू करण्यात आले.

यावेळी आ.संग्राम थोपटे, आ.संजय जगताप, देविदास भन्साळी, काँग्रेस पक्षाचे भोर तालुका अध्यक्ष शैलेश सोनवणे, वेल्हे (राजगड) तालुका अध्यक्ष नानासो राऊत, मुळशी तालुका अध्यक्ष गंगाराम मातोरे, लहूनाना शेलार, महेश टापरे, माऊली पांगारे, रोहन बाठे, शिवराज शेंडकर,तसेच भोर,वेल्हा, मुळशी, पुरंदरचे काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी खेड शिवापूर टोल नाक्यावरील आंदोलन कर्त्यांनी सातारा बाजूकडील टोलवर आंदोलन करून सर्व वाहने टोल न भरता सोडून दिली व त्यानंतर मुख्य टोलनाक्यावर काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांनी ठिय्या मांडला.

### रस्ते सुस्थितीत होईपर्यंत टोलमध्ये २५ टक्के सवलत

**कोल्हापूर :** किणी टोल नाक्यावर काँग्रेसच्यावतीने जोरदार आंदोलन करण्यात येत होत याची दखल राज्य सरकारने घेतलीय. रस्ते सुस्थितीत होईपर्यंत टोलमध्ये २५ टक्के सवलत देण्यात येणार आहे,टोल नाक्याच्या २० किलोमीटर परिसरातील वाहनांना टोल आकारणी न करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतलाय. तसंच ५० टक्के टोल सवलतीच्या मागणीबाबत केंद्राकडे प्रस्ताव पाठवण्यात येणार असल्याचंही सांगण्यात आलंय. यावेळी सर्व्हिस रोडवरील खड्डे १५ दिवसात बुजवण्याचं आश्वासन राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने दिलय. त्यामुळे काँग्रेसच्या आंदोलनाला यश आलय. राज्य सरकारच्या या भूमिकेनंतर काँग्रेसने आंदोलन स्थगित केलंय.

वाहनांना ५० टक्के टोल सवलत देण्याची मागणी असून याबाबत एक महिना वाट पाहून पुढील आंदोलनाची दिशा ठरवणार, असल्याचं यावेळी आमदार सतेज पाटील यांनी सांगितले. पुणे कोल्हापूर राष्ट्रीय महामार्गाच्या दुरुस्तीचे काम पूर्ण होईपर्यंत टोल मध्ये ५० टक्के सूट मिळावी ही काँग्रेसची मागणी होती. आजपासून प्राधिकरणाने २५ टक्के सूट देण्याचे मान्य केले व उर्वरित २५ टक्के सूट

# उद्धव ठाकरेंची एकेरी भाषा महाराष्ट्राच्या सभ्यतेला शोभत नाही

### भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष माधव भंडारी यांची टीका

**सातारा :** महाराष्ट्राच्या राजकारणाला सभ्यतेची एक परंपरा आहे. या परंपरेमध्ये उद्धव ठाकरे यांची अलीकडच्या काळातील वक्तव्य अजिबात शोभत नाहीत .एक तर तुम्ही राहाल नाहीतर मी राहील या वक्तव्याने त्यांचे नैराश्य समोर आले आहे अशी कडवट टीका भारतीय जनता पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष माधव भंडारी यांनी पत्रकार परिषदेत केली. बजेट जर समजत नसेल तर विरोधकांनी उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांचे पुस्तक वाचावे असा उपरोधिक टोलाही त्यांनी लगावला

येथील शासकीय विश्रामगृहांमध्ये माधव भंडारी यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी भाजप जिल्हाध्यक्ष धैर्यशील कदम, शहराध्यक्ष विकास गोसावी केंद्र शासनाच्या अर्थसंकल्पामध्ये महाराष्ट्रासाठी कोणत्या तरतुदी आहेत याचा आढावा घेत त्यांनी माहिती दिली. केवळ राजकीय स्वार्थासाठी जनतेमध्ये संभ्रम निर्माण करून अफवा पसरवण्याच्या विरोधकांच्या कटाचा नवा चेहरा उघड झाला आहे असे ते म्हणाले . अर्थसंकल्पात महाराष्ट्राला मिळालेल्या निधीचा थांगपत्ता न लागल्यामुळे, विरोधकांनी सुरू केलेल्या शेरेबाजीला उपमुख्यमंत्री फडणवीस यांच्यासह अनेक नेत्यांनी चोख उत्तर दिल्याने विरोधकांचे अर्थसंकल्पाविषयी अज्ञान उघडे पडले आहे .आपल्याला अर्थसंकल्पातले कळत नाही अशी जाहीर कबुली मुख्यमंत्री पदावर असताना उद्धव ठाकरे यांनी दिली होती त्यांचे हे अज्ञानात उघड झाले आहे अर्थसंकल्प समजून घेण्यासाठी विरोधकांनी देवेंद्र फडणवीस यांनी लिहिलेले पुस्तक वाचावे असा उपरोधिक सल्ला माधव भंडारी यांनी दिला

काही दिवसापूर्वी उद्धव ठाकरे यांनी महाराष्ट्राच्या

# काहींना मी राजकीय क्षितीजावर नकोय : हर्षवर्धन पाटील

**इंदापूर :** निवडणूका आल्या की काही यंत्रणा आणि काही जण मला जाणीवूर्वक टार्गेट करीत आहेत. एकटही पाडण्याचा प्रयत्न केला जातो. आम्ही आघडीत असो किंवा महायुतीत असलो तरी आम्हाला टार्गेट केलं जातंय. हर्षवर्धन पाटील हे राजकारणाच्या क्षितिजावर नको अशी काहींची भूमिका आहे, अशी खदखद माजी मंत्री आणि भाजपचे ज्येष्ठ नेते हर्षवर्धन पाटील यांनी व्यक्त केली. ते इंदापुरमध्ये बोलत होते.

हर्षवर्धन पाटील म्हणाले, आम्ही दादागिरी, अपशब्द वापरत नाहीत, त्रास कधी कुणाला त्रास दिला नाही. निवडणूक आली की हर्षवर्धन पाटील यांना टार्गेट केलं जातं. हे षडयंत्र आहे. लोकसभेला आम्ही संघर्ष असताना आम्ही काम केलं. आता वेळ आली की हर्षावधन पाटील यांना एकट पाडायचं. त्यांचे राजकारण संपवण्याचे काम करतात. आता बरेच जन आमच्या विरोधात कट कारस्थानं करतील. इंदापूरची लोकं ठरवतील. आम्हाला टार्गेट करण्याचा प्रयत्न केला जात आहे, याचा वास आम्हाला येतोय. मध्यंतरी बंदी घालण्याचा प्रयत्न केला जातोय. गावा गावात आम्हाला फिरू दिले जात नव्हतं, तसे प्रयत्न देखील केले गेले. आताही तसेच काहीतरी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.



हर्षवर्धन पाटलांच्या कार्यकर्त्यांनी अपक्ष निवडणूक लढण्यासाठी बॅनरबाजी केली आहे. १९९५, १९९९ आणि २००४ या तीन निवडणुका हर्षवर्धन पाटलांनी अपक्ष लढवल्या आणि त्या जिंकल्या आहेत. राष्ट्रवादीचे नेते अजित पवार २०१९ प्रमाणे इंदापूरची जागा सोडणार नाहीत. हर्षवर्धन पाटलांना पुन्हा एकदा दगा देतील हे ओळखूनच हर्षवर्धन पाटलांच्या कार्यकर्त्यांनी हे बंडाचा हत्यार उपासलं असल्याचे बोलले जात आहे. हर्षवर्धन पाटील आणि अजित पवार हे एकमेकांचे कट्टर राजकीय विरोधक आहेत. १९९५, १९९९ आणि २००४ या तीन निवडणुका हर्षवर्धन पाटलांनी अपक्ष लढवल्या आणि त्या जिंकल्यात. अजित पवारांच्या त्रासाला कंटाळूनच हर्षवर्धन पाटलांनी २०१९ ला काँग्रेस सोडली होती, पण तेच अजित पवार आता हर्षवर्धन पाटलांच्या राजकीय प्रवासात अडसर ठरतील आणि पुन्हा इंदापूरच्या जागेवर दावा करतील हे ओळखूनचं हर्षवर्धन पाटलांचा कार्यकर्ता पेटून उठला असल्याच्या चर्चा आहेत.

# उजनी धरणाची वाटचाल शंभरीच्या दिशेने

**सोलापूर :** जिल्ह्यासाठी वरदान असलेल्या उजनी धरणात सह्याद्री घाटमाथ्यासह भीमा खोऱ्यात पडणाऱ्या जोरदार पावसामुळे पाणीसाठा झपाट्याने भरत आहे. धरण आता शंभर टक्के पाणीसाठ्याच्या दिशेने वाटचाल करू लागले आहे. येत्या दोन दिवसांत धरण शंभर टक्के भरण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

शनिवारी सायंकाळी सहापर्यंत धरणात एकूण पाणीसाठा १०५.४९ टीएमसी



अर्थात उपयुक्त पाणीसाठा ४१.७८ टीएमसी म्हणजे ७७.९९ टक्के होता. रात्रीपर्यंत धरणाची वाटचाल ८० टक्के भरण्याच्या दिशेने सुरू होती.

दरम्यान, पुण्यातील बंडगार्डनसह दौंड येथून उजनी धरणात येणाऱ्या पाण्याचा विसर्ग प्रचंड वाढल्यामुळे येत्या दोन दिवसांत धरण शंभर टक्के भरण्याची चिन्हे दिसत आहेत.

दरम्यान, धरण शंभर टक्के पाणीसाठ्याकडे वाटचाल करू लागल्यामुळे जलसंपदा विभागाने धरणातून येत्या ५ ऑगस्टपासून मुख्य कालव्यात तीन हजार क्युसेक विसर्गाने पाणी सोडण्याचा निर्णय घेतला आहे. दुसरीकडे धरणावरील जलविद्युत निर्मिती प्रकल्पही सुरू करण्याच्या हालचाली वाढल्या आहेत.शनिवारी सकाळी सहापर्यंत उजनी धरण ७२.१९ टक्के भरले होते. त्यात १२ तासांत ६ टक्क्यांनी वाढ झाली. धरणात दौंड येथून येऊन मिसळणाऱ्या पाण्याचा विसर्ग आणखी वाढविण्यात येऊन तो ६८ हजार ६०० क्युसेक करण्यात आला होता. तर बंडगार्डन परिसरातून दौंडच्या दिशेने येणाऱ्या पाण्याचा विसर्गही ४८ हजार ८८७ क्युसेकपर्यंत वाढविण्यात आला होता.

# अलिगडमध्ये ९४ मदरसे बंद



**लखनौ :** उत्तर प्रदेशमध्ये मुख्यमंत्री आदित्यनाथ योगी यांचे तडखाफडखीचे निर्णय आणि बुलडोझर कारवाई याची चर्चा देशभरामध्ये चालू असते. उत्तर प्रदेशात सुरू असलेले मदरसे पुन्हा एकदा मुख्यमंत्री योगींच्या रडारवर आले आहेत. नोंदणी नसलेल्या मदरशांची यादी अधिकाऱ्यांना बनवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. यादी बनवण्यास अधिकाऱ्यांनी सुरुवात केली असून अलीगडमधील मदरशांवर कारवाई करण्यात आलेली आहे.

अलिगड जिल्ह्यातील जिल्हा अल्पसंख्याक कल्याण अधिकाऱ्यांच्या अहवालात ९४ मदरसे बेकायदेशीरपणे सुरू असल्याचे आढळून आले आहे. या मदरशांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना जवळच्या प्राथमिक शाळांमध्ये हलवण्यात येणार आहे. मुले स्थलांतरित होताच या बेकायदेशीर मदरशांना लवकरच टाळे ठोकण्यात येणार आहे. याबाबत योगी सरकारने निर्णय घेतला आहे. जिल्हा अल्पसंख्याक कल्याण अधिकारी निधी गोस्वामी यांनी सांगितले की, सर्वेक्षणात जिल्ह्यातील एकूण ९४ मदरसे नोंदणीकृत नसल्याचे समोर आले आहे. त्यांना कोणत्याही मंडळाकडून किंवा इतर कोणत्याही प्रकारची मान्यता मिळालेली नाही. त्यांनी सांगितले की, या बेकायदेशीर मदरशांमध्ये शिकणाऱ्या मुलांना जवळच्या मूलभूत शिक्षणाच्या शाळांमध्ये प्रवेश दिला जाईल.

# 'मुंबई महानगरात पोलिसांना पुरेशा सदनिकांसाठी तातडीने प्रस्ताव तयार करा : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**मुंबई :** पोलीस दिवसरात्र आपले रक्षण करतात, पण मुंबईतल्या पोलिसांना राहण्यासाठी घरे नाहीत. आपल्याला पोलिसांसाठी लवचिक भूमिका ठेवावी लागेल, म्हाडा, सिडको, एमएमआरडीए, नगरविकास विभाग यांनी एकत्रितपणे आपल्याला कशा पद्धतीने मुंबई आणि परिसरात पोलिसांसाठी सेवा सदनिका उपलब्ध करून देता येतील ते प्राधान्याने आणि कालबद्ध पद्धतीने ठरवावे असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी निर्देश दिले. वरळी येथील पोलीस वसाहतीच्या समस्याही तत्काळ दूर करण्यासाठी आठ दिवसांच्या आत कार्यवाही व्हावी असेही ते म्हणाले. आज महाराष्ट्र निवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्यासमवेत मुख्यमंत्र्यांची वर्षा येथे बैठक झाली. यावेळी पोलीस वसाहतीतील रहिवासी देखील उपस्थित होते.पोलिसांना सेवा सदनिका देण्यासंदर्भात कार्यवाही करासध्या मुंबईत १८ हजार शासकीय सेवा सदनिका उपलब्ध असून, एकूण पोलीस अधिकारी व कर्मचारी ५२ हजार आहेत. केवळ २५ टक्के कर्मचाऱ्यांना राहण्यासाठी सदनिका आहेत, अशी माहिती पोलीस सह आयुक्त जयकुमार यांनी यावेळी दिली. पोलिसांच्या संख्येच्या तुलनेत ही खूप अपुरी असून बीडीडी चाळीमध्ये ज्या पद्धतीने पोलिसांना मालकी हक्काने सदनिका दिल्या आहेत. त्याप्रमाणे मुंबईत इतरत्रही पोलीस कर्मचाऱ्यांना सदनिका कशा देता येतील हे पाहावे. सध्या ज्या ज्या गृहनिर्माण योजना सुरु आहेत त्यात पोलिसांना काही सदनिका राखीव ठेवता येतात का? पुनर्विकसित प्रकल्पांमध्ये प्रोत्साहनपर एफएसआय देता येतो का, तसेच खासगी विकासकांच्या प्रकल्पात सदनिका राखीव ठेवता येतील का यादृष्टीने तातडीने संबंधित विभागांनी कार्यवाही करावी असेही मुख्यमंत्री म्हणाले. दंडनीय शुल्काबाबतचा प्रस्ताव तातडीने ठेवाया बैठकीत वरळी पोलीस वसाहतीतील निवृत्त कर्मचाऱ्यांनी देखील अनुद्येय कालावधी नंतर लावण्यात येणाऱ्या दंडाच्या रकमेविषयी तक्रारी केल्या. १५० रुपये प्रति चौरस फुट असे अवाजवी दंडनीय शुल्क लावले जाते. कर्मचाऱ्यांना सेवा निवृत्तीनंतर ही मोठी रक्कम भरणे शक्य होत नाही. तसेच अनेक अनुकंपा तत्वावरील पोलीस कर्मचाऱ्यांना सदनिका रिकामी करून देण्यास सांगण्यात येते अशा तक्रारी करण्यात आल्या.

# कराड-उत्तरमधील विकास कामांसाठी ४ कोटी ६२ लाखांचा निधी मंजूर

## आ. बाळासाहेब पाटील यांचे विशेष प्रयत्न



**कराड** : कराड-उत्तरचे आमदार श्री. बाळासाहेब पाटील साहेब माजी मंत्री सहकार, पणन महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री सातारा जिल्हा यांचे विशेष प्रयत्नाने जिल्हा वार्षिक योजना सन २०२४-२५ अंतर्गत जनसुविधा योजना व स्मार्ट प्राथमिक आरोग्य केंद्र बांधकाम व दुरूस्ती योजना या योजनांमधून खालील गावांमधील कामांना रक्कम रू.४ कोटी ६२ लक्ष निधी मंजूर होवून प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. त्यामुळे या गावांमधील व परिसरातील नागरीकांना आरोग्याच्या सोईसुविधा उपलब्ध होणार आहेत.

यामध्ये जनसुविधा योजनेमधून कोपर्डे हवेली ता. कराड येथे स्मशानभुमी सुधारणा व सुशोभिकरण करणे रू.१० लक्ष, हरपळवाडी ता. कराड येथील अंतर्गत रस्ते काँक्रीटीकरण करणे रू.७ लक्ष, गिरीजाशंकरवाडी (आंबेदरवाडी) ता. खटाव येथे स्मशानभुमी वेटींग शेड व संरक्षक भिंत बांधणे रू.१० लक्ष, मुसांडवाडी ता. खटाव अंतर्गत जगतापवाडी येथे स्मशानभुमी शेड बांधणे रू.१० लक्ष, गवळणवाडी ता. सातारा येथे अंतर्गत रस्ता काँक्रीटीकरण करणे रू.५ लक्ष, गणेशवाडी ता. सातारा येथे अंतर्गत रस्ता काँक्रीटीकरण करणे रू.५ लक्ष, धामणेर ता. कोरेगांव येथे मुस्लीम समाजाच्या दफनभुमीस संरक्षक भिंत बांधणे रू.१० लक्ष, नागझरी ता. कोरेगांव येथील अंतर्गत रस्ते ट्रीमिक्स काँक्रीटीकरण करणे रू.१० लक्ष, कामेरी ता. सातारा येथे कामेरी रस्त्यापासून घाडगे विद्यालयाकडे जाणारा रस्ता काँक्रीटीकरण करणे रू.१० लक्ष व स्मार्ट प्राथमिक आरोग्य केंद्र बांधकाम व दुरूस्ती योजनेमधून उंब्रज ता. कराड येथील प्रा. आ. केंद्रामध्ये प्रसूतिगृह विस्तारीकरण, मुख्य इमारतीची दुरूस्ती, रम्प, पत्रा बसवणे, रंगकाम, फरशी व स्मार्ट प्रा.आ. केंद्र करणेसाठीची इतर अनुषंगिक कामे करणे रू.९७.३० लक्ष, हेळगांव ता. कराड येथील प्रा.आ. केंद्रामध्ये प्रसूतिगृह विस्तारीकरण, मुख्य इमारतीची दुरूस्ती, शेड करणे, आवश्यकतेनुसार विद्युतिकरण, रंगकाम, फरशी व स्मार्ट प्रा.आ. केंद्र करणेसाठीची इतर अनुषंगिक कामे करणे रू.९७.२५ लक्ष, नागठाणे ता., जि. सातारा येथील प्रा.आ. केंद्रामध्ये नादुरूस्त दरवाजे खिडक्या त्या ठिकाणी नविन ग्रेनाइट फ्रेम करून फ्लश डोअर व विंडो बॉक्सिंग करून श्री ट्रॅक स्लायडींग खिडक्या बसवणे, गरजेनुसार जोत्यावर एम-१० पी.सी.सी. करणे, शौचालय कमोड व इतर दुरूस्ती, इमारतीची गळती काढणेसाठी वॉटरप्रुफिंग करणे, नविन विद्युतीकरण व रेन वॉटर हार्वेस्टिंग तरतुद, फर्नीचर करणे रू.९०.३८ लक्ष, नांदगांव ता., जि. सातारा येथील प्रा. आ. केंद्रामध्ये प्रसुती रूम अध्यावत करणे, मिटींग हॉल, अंतर्गत रस्ते खडीकरण व डांबरीकरण करणे, संपुर्ण विद्युतीकरण, आतुन बाहेरून रंगकाम, फरशी बदलने, खिडक्यांची ग्रील करणे, फर्नीचर करणे रू.९९.८५ लक्ष निधी मंजूर झाला आहे.

## सत नामदव महाराजाच्या पुण्यातथा सोहळ्यानिमित्त पालखी मिरवणूक संपन्न



**सातारा** : श्री संत शिरोमणी नामदेव महाराज यांचा ६७४ वा संजीवन समाधी सोहळा साताऱ्यात शिंपी आळीतील मंदिरात मोठ्या उत्साहात साजरा होतो आहे.

विठ्ठल नामाची कास धरून हरिनामाचा प्रचार करणाऱ्या शिंपी समाजाचे संत नामदेव महाराजांची पुण्यतिथी सातारा शहरात अखिल भारतीय नामदेव समाज संघाचे वतीने मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

संत नामदेव महाराज पुण्यतिथी निमित्त शुक्रवारी खण आळी परिसरातील नामदेव मंदिरात विशेष पूजा तसेच भजनांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. शहरातील मोती चौक होणारी राजपथ मार्गे समस्त शिंपी बांधवांनी नामदेव महाराजांच्या पादुका व प्रतिमांची पाई पालखी मिरवणूक काढून हरिनामाचा गजर केला या मिरवणुकीमध्ये वारकरी संप्रदायाची भजने तसेच हरिनामाचा गजर करत मोठ्या प्रमाणात स्त्री-पुरुष विठ्ठल भक्त सहभागी झाले होते.

# सांगली जिल्ह्यातील पूर पट्ट्यातील अतिरिक्त पाणी दुष्काळी भागात सोडावे : ॲड. वैभव पाटील

**विटा** : चालू वर्षी मागील वर्षाच्या तुलनेत पाऊस चांगला असल्याने सांगली जिल्ह्यात पूर परिस्थिती निर्माण झाली आहे. कोयना आणि वारणा धरणातून पाण्याचा मोठ्या प्रमाणात विसर्ग सुरू आहे. त्यामुळे कृष्णा वारणा नदीच्या पाणी पातळीत वाढ होऊन या नद्यांच्या काठावरील गावात पूर परिस्थिती निर्माण होत आहे. अशा परिस्थितीत महापूराचे पाणी दुष्काळी भागातील तलाव भरण्यासाठी द्यावे, अशी मागणी करणारे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे निवेदनाद्वारे राष्ट्रवादी काँग्रेस जिल्हाध्यक्ष वैभव पाटील यांनी केली आहे.



प्रसिद्ध दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, महापूराने परिसरातील जनजीवन विस्कळीत होत आहे. त्याचबरोबर मनुष्य व प्राण्यांचे जीवन धोकादायक बनत आहे यावर उपाययोजना म्हणून प्रशासनाने या धरणातून वाया जाणारे पाणी दुष्काळी पट्ट्यात फिरवले असता दुष्काळी भागात पाण्याचा तुटवडा भासणार नाही

आणि नदीकाठच्या गावात पूर परिस्थिती निर्माण होणार नाही त्यामुळे हे अतिरिक्त पाणी सांगली जिल्ह्यातील पूर्व भागात सोडले असता त्या ठिकाणचा शेतकरी वर्ग सुद्धा समाधानी होऊन पशुधनाच्या चाऱ्याचा प्रश्न सुद्धा निकालात निघेल त्याचबरोबर नदीकाठच्या लोकांना ही त्रास होणार नाही प्रशासनावर सुद्धा ज्यादा बोजा पडणार नाही तरी पुराचे पाणी खानापूर आटपाडी जत परिसरात फिरवावे, याबाबत सांगली जिल्हा राष्ट्रवादी ग्रामीणचे अध्यक्ष वैभव पाटील यांनी उपमुख्यमंत्री पवार यांच्याकडे मागणी केली आहे.

# राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या जिल्हा कार्याध्यक्षपदी ॲड. मुळीक यांची फेरनिवड

**विटा** : सांगली जिल्हा राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पार्टीच्या कार्याध्यक्ष पदी ॲड. बाबासाहेब मुळीक यांची निवड केली. निवडीचे पत्र प्रदेशाध्यक्ष जयंतराव पाटील यांनी दिले. कै. लोकनेते राजारामबापू पाटील यांच्या जयंतीचे औचित्य साधून या निवडी करण्यात आल्या.

यावेळी बोलताना जयंतराव पाटील म्हणाले, ॲड. मुळीक यांनी आजवर पक्षासाठी मोलाचे योगदान दिले आहे. ॲड. मुळीक हे जेष्ठ विधिज्ञ आहेत त्यांच्या कायदा, राजकारण यातील ज्ञानाचा फायदा पक्षाला नेहमीच होत आलेला आहे. येणाऱ्या काळात ते पक्षाची संघटनात्मक बांधणी उत्तमरित्या



पार पडतील.

यावेळी आमदार मानसिंगराव नाईक, आमदार सुमनताई पाटील, आमदार अरुणआण्णा लाड, माजी मंत्री शिवाजीराव नाईक, चिमण डांगे, माजी जिल्हाध्यक्ष अविनाश पाटील यांनी अभिनंदन केले.

याप्रसंगी बाळासाहेब पाटील, मन्सूर खतीब, सुरेश शिंदे, हणमंतराव देशमुख, ॲड. संदीप मुळीक, किसनराव जानकर यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

## तक्रारींचा निपटारा तात्काळ करावा

**सातारा** : ग्राहक परिषदेकडून अनेक तक्रार अर्ज पुरवठा कार्यालयास प्राप्त होत असतात. ते संबंधित विभागांना पाठविले जातात. संबंधित विभागांनी तक्रारी अर्जांचा तात्काळ निपटारा करावा, असे आवाहन जिल्हा पुरवठा अधिकारी व जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेचे सदस्य समितीचे सदस्य सचिव वैशाली राजमाने यांनी केले. वीज चोरी रोखण्यासाठी महावितरणने कडक कारवाई करावी यासह अशासकीय सदस्यांनी मांडलेल्या आदी समस्यांवर विषयांवर बैठकीत चर्चा झाली. राजमाने यांचे अध्यक्षतेखाली पार पडली परिषदेचे अशासकीय सदस्य आणि संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.



**मालखेड : येथे फॉगिंग मशीनद्वारे धूर फवारणी कामाचा शुभारंभ करताना सरपंच इंद्रजीत ठोंबरे, ग्रामपंचायत सदस्य तानाजी माने व ग्रामस्थ**

## मालखेड येथे फॉगिंग मशीनद्वारे धुर फवारणी

**वाठार** : मालखेड ता. कराड येथे ग्रामपंचायतीच्या वतीने गावामध्ये पावसाळ्यामध्ये डेंगूचा प्रादुर्भाव वाढू नये. यासाठी मालखेड ग्रामपंचायत सतर्क झाली असून त्या अनुषंगाने मालखेड ग्रामपंचायतीने गावातील विविध ठिकाणी फॉगिंग मशीनद्वारे धुर फवारणी करण्यात आली. त्यामुळे या पुढच्या काळात डासांचे निर्मूलन होणार आहे.

यावेळी मालखेड ग्रामपंचायतीचे विद्यमान सरपंच इंद्रजीत ठोंबरे, ग्रामपंचायत सदस्य तानाजी माने, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष राजेंद्र लोकरे, विश्वनाथ सावंत, राजेंद्र सावंत, सुभाष लोकरे, रमेश निकणके, ग्रामसेविका अनुराधा पुजारी, शरद मोरे, ग्रामपंचायत कर्मचारी संभाजी कोळी व ग्रामस्थ उपस्थित होते.

# धैर्यशील कदम सर्वसामान्यांचे आधारस्तंभ : भीमराव पाटील

**पुसेसावळी** : कराड उत्तर विधानसभा मतदारसंघातील सर्वसामान्य, गोरगरीब, शोषित, कामगार, वंचित, सर्वसामान्य शेतकरी, महिला, युवक अशा सर्व वर्गाला आपलेसे करून त्यांना न्याय देण्यासाठी रात्रं-दिवस कष्ट करणारे व्यक्तिमत्व म्हणून धैर्यशील कदम आधारस्तंभ बनून कार्य करत आहेत असे प्रतिपादन रहिमतपूर भाजपा मंडल अध्यक्ष भीमराव पाटील यांनी केले.



**वाठार कि. येथे रामराज्य रथाच्या स्वागतप्रसंगी भीमराव पाटील, विक्रमबाबा कदम, राजकिरण पाटील, गणेश गायकवाड, सुनिल कांबळे व इतर मान्यवर.**

वाठार (कि.), ता. कोरेगाव येथे कराड उत्तर भारतीय जनता पार्टीच्या वतीने काढण्यात आलेल्या रामराज्य रथाच्या स्वागताप्रसंगी ते बोलत होते. यावेळी वर्धन ॲग्रो कारखान्याचे कार्यकारी संचालक विक्रमबाबा कदम, अंबिका विकास सेवा सोसायटीचे चेअरमन राजकिरण पाटील, किसान मोर्चाचे सरचिटणीस गणेश गायकवाड, सरपंच सुनील कांबळे, उपसरपंच ज्ञानदेव गायकवाड आदि मान्यवर उपस्थित होते.

भीमराव पाटील पुढे म्हणाले, महाराष्ट्र शासनाच्या धर्तीवर शासन आपल्या दारी या उपक्रमासारखा आपल्या कराड उत्तर विधानसभा मतदारसंघात भाजपा सातारा जिल्हाध्यक्ष धैर्यशील कदम यांच्या पुढाकाराने रामराज्य रथ विकसित भारत, भाजपा आपल्या दारी हा उपक्रम सुरु असून या माध्यमातून सर्वसामान्य जनता व महिलांपर्यंत राज्य व केंद्र सरकारच्या विविध जनकल्याणाच्या योजना पोहचविण्याचा प्रयत्न आहे. समाजाच्या शेवटच्या घटकांपर्यंत शासनाचा लाभ पोहचवाला पाहिजे या विचाराने धैर्यशील कदम कार्यरत असून भाजपाच्या वतीने आपल्या भागाचा चौफेर विकास करून सामान्य माणसाला न्याय देण्याची त्यांची भूमिका आहे अशी माणसे सामान्यांसाठी आधारस्तंभ बनतात व समाज मनाच्या हृदयात कायम स्थान निर्माण करतात.

प्रास्तविकातून उपसरपंच शंकर गायकवाड यांनी रामराज्य रथाच्या हेतूचे कथन करून उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले. तर आभार माजी तंटामुक्ती अध्यक्ष मानाजी पवार यांनी मानले.

यावेळी संतोष गायकवाड, ग्रामविकास अधिकारी मधूकर सोनलकर, ग्रामपंचायत सदस्य शिवाजी माळी, केशव गुजले, सुनंदा गायकवाड, अनिता पिसे, उषा गायकवाड, नारी मंच अध्यक्ष अश्विनी कदम, युवती मंच अध्यक्ष ऐश्वर्या चव्हाण, जेष्ठ नागरीक संघाचे अध्यक्ष सिताराम गायकवाड, सरस्वती सार्वजानिक वाचनालयाचे अध्यक्ष उमेश गायकवाड यांच्यासह वाठार किरोली गावचे ग्रामस्थ, महिला, युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बेलवडे हवेलीच्या नवनिर्वाचित सरपंचांचा सत्कार



**कराड : बेलवडे हवेलीच्या नवनिर्वाचित सरपंचांचा सत्कार करताना आ. पृथ्वीराज चव्हाण समवेत इतर मान्यवर**

**कराड** : बेलवडे हवेली गावच्या सरपंच पदी सौ. अंजना प्रकाश पवार यांची सर्वानुमते निवड झाली. सौ पवार या काँग्रेस पक्षाच्या सदस्यां असून त्यांची सरपंच पदी नियुक्ती झाल्याने गावातील काँग्रेसच्या सदस्यांना एक ताकद मिळाली आहे. आज यानिमित्त राज्याचे माजी मुख्यमंत्री आ. पृथ्वीराज चव्हाण यांच्याकडून नवनिर्वाचित सरपंचांचा सत्कार करण्यात आला. यावेळी प्रकाश पवार, माजी ग्रामपंचायत सदस्य सुनील पाटील, कराड उत्तर काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस प्रताप पवार, माजी उपसरपंच सूर्यकांत पाटील, महेश कुंभार, शिवाजी इनामदार, अशोक पवार, लालासो पवार, मोहन पवार, प्रकाश पवार, सुशांत इनामदार आदी यावेळी उपस्थित होते.

यावेळी माजी मुख्यमंत्री आ. पृथ्वीराज चव्हाण म्हणाले की, सरपंच हा गावचा प्रमुख म्हणजेच एकप्रकारे कुटुंब प्रमुखच असतो. गावातील सार्वजनिक कामे प्राधान्याने मार्गी लावली पाहिजेत. गावातील बंधुता अखंडता ठेवण्यासाठी कायम प्रयत्न केले पाहिजेत. शासकीय योजनांचा जास्तीत जास्त उपयोग ग्रामस्थांना होण्यासाठी सरपंच व त्यांच्या सदस्यांनी प्रयत्न केले पाहिजेत.

# अवयवदान हे रुग्णांना दुसऱ्या आयुष्याची आशा देण्याचे उदात्त कारण बनू शकते : पालकमंत्री मुश्रीफ

**कोल्हापूर** : अवयवदान हे अवयव निकामी झालेल्या रुग्णांना दुसऱ्या आयुष्याची आशा देण्याचे उदात्त कारण आहे असे प्रतिपादन वैद्यकीय शिक्षण व विशेष सहाय्य मंत्री तथा कोल्हापूर जिल्ह्याचे पालकमंत्री हसन मुश्रीफ यांनी केले. त्यांनी अवयवदानाचे महत्त्व भारत सरकारच्या स्वास्थ्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या निर्देशानुसार जुलै २०२४ हा अवयवदान महिना अनुषंगाने राजश्री छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व छत्रपती प्रमिला राजे रुग्णालय, कोल्हापूर येथे साजरा करण्यात आला त्यावेळी बोलताना सांगितले. ते म्हणाले एक शव देणगी शेवटच्या टप्प्यातील अवयवांना नुकसान झालेल्या ८ सदस्यांना जीवनाचा आधार देऊ शकते.



राजश्री छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व छत्रपती प्रमिला राजे रुग्णालयामध्ये महिनाभरात चित्रकला, रांगोळी, वक्तृत्व, पोस्टर, कविता अशा विविध स्पर्धांचे आयोजन या महिन्यात केले होते. ३ ऑगस्ट रोजी राष्ट्रीय अवयवदान दिन साजरा करण्यात आला. यामध्ये महाविद्यालयात अवयव दान जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले.

रॅलीची सुरुवात छत्रपती प्रमिलाराजे रुग्णालय आवारा मधून कोल्हापूर जिल्ह्याचे पालकमंत्री हसन मुश्रीफ यांनी हिरवा झेंडा दाखवून केली. मंत्री महोदयांनी अवयव दानाची आवश्यकता व त्याबाबतची जनजागृती या विषयावर सर्व उपस्थितांना संबोधित केले व अभियानाचा समारोप जाहीर केला.

त्यावेळी राजश्री छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. सत्यवान मोरे, वैद्यकीय अधीक्षक डॉ. शिशिर मिरगुंडे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सुप्रिया देशमुख, नोडल अधिकारी डॉ. प्रदीप राऊत, वैद्यकीय उपाधीक्षक डॉ. गिरीश कांबळे, सर्व विभागांचे विभाग प्रमुख व अध्यापक, विद्यार्थी तसेच निवासी डॉक्टर्स उपस्थित होते व त्यांनी रॅलीमध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. रॅलीमध्ये नर्सिंग कॉलेजच्या प्राचार्या, विद्यार्थी - विद्यार्थीनी , नर्सिंग स्टाफ, वैद्यकीय समाजसेवक अधीक्षक कार्यालय यांचा उत्स्फूर्त सहभाग होता. रॅली नंतर मान्यवरांच्या हस्ते महिनाभरात झालेल्या विविध स्पर्धांच्या विजेत्यांना बक्षीस वितरण करण्यात आले. तसेच अवयवदानाबद्दल सामूहिक प्रतिज्ञा घेण्यात आली.

योगेश अग्रवाल, 'द फेडरेशन ऑफ ऑर्गन डोनेशन व बॉडी डोनेशन' या स्वयंसेवी संस्थेचे अध्यक्ष व त्यांची सर्व टीम यांनी रॅलीमध्ये सहभाग नोंदवला. तसेच योगेश अगरवाल यांनी अवयव दाना बद्दल जनजागृतीसाठी व्याख्यान दिले व उपस्थिताना त्यांच्या संघटनेच्या कार्याचा आढावा दिला.

## बेपत्ता माजी सरपंच हुसरे यांचा मृतदेह सापडला



**कोल्हापूर** : अकिवाट येथील कृष्णा नदीच्या महापुरात ट्रॅक्टर उलटल्याने पाण्यातून वाहून बेपत्ता झालेले अकिवाट गावचे माजी सरपंच आण्णासो हसुरे यांचा मृतदेह राजापूर ओतात (ओढा) वजीर रेस्कू फोर्सला सापडला. दरम्यान जिल्हा परिषदेचे माजी सदस्य इकबाल बैरगदार अद्याप बेपत्ता असून रेस्कू फोर्स, एनडीआरएफ, व्हाइट आर्मीच्या जवानांचे दुसऱ्या दिवशीही शोधकार्य सुरू आहे.

शुक्रवारी दि. २ रोजी शिरोळ तालुक्यातील अकिवाट बस्तवाड रस्त्यावर कृष्णा नदीच्या पुराच्या पाण्यातून ट्रॅक्टर उलटल्याने नऊ जण बुडाले होते. यात एकाचा मृत्यू झाला. तर सात जण बचावले होते. दोघे बेपत्ता असल्याने एकूण सात यांत्रिक बोटींच्या सहाय्याने शोधमोहीम सुरू होती. आज, शनिवारी सकाळी पुन्हा शोधमोहीम सुरु असताना वजीर रेस्कू फोर्सला बेपत्ता हसुरे यांचा मृतदेह शोधण्यात यश आले. बोटीतून मृतदेह बाहेर आणताच नातेवाईकांनी फोडलेला हंबरडा उपस्थितांचे काळजी पिळवटून टाकणारा होता. या घटनेमुळे संपूर्ण पंचक्रोशीत शोककळा पसरली आहे.

# रस्ते अपघातग्रस्तांना दिलासा

## जखमींवर कॅशलेस उपचार : केंद्राची घोषणा

रस्ते अपघातातील जखमींवर आता कॅशलेस पद्धतीने उपचार होणार आहेत. आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेत दिड लाखापर्यंत हे उपाचर केले जाणार आहेत. ही योजना सध्या प्रायोगिक तत्त्वावर चंदीगड आणि आसाममध्ये सुरू करण्यात आलेली आहे. राष्ट्रीय आरोग्य प्राधिकरण, रस्ते वाहतूक मंत्रालय यांच्यावतीने ही योजना सुरू करण्यात आलेली आहे.केंद्रीय मंत्रीनितीन गडकरीयांनी राज्यसभेत या योजनेची माहिती देण्यात आलेली आहे. वाहनामुळे झालेला अपघात, तसेच तो कोणत्याही रस्त्यावर झाला असेल तरीही हे उपचार मिळणार आहेत.

Motor Vehicle -ccident Fund मधून होणार खर्चया योजनेत लाभार्थींना ट्रॉमा आणि पॉलिट्रॉमा संबंधित उपचार नोंदणीकृत हॉस्पिटलमध्ये केले जातील. जास्तीजास्त दीड लाखापर्यंतचा खर्च या अंतर्भूत आहे. अपघात झाल्यानंतर सात दिवसांत झालेल्या उपचारांचा खर्च यात केला जाईल, असे झखइने प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे.

मंत्रलायने Motor Vehicle Accident



Fund गठित केलेला आहे, त्यातून हा उपचाराचा खर्च केला जाणार आहे. ही योजना राबवण्यासाठी राष्ट्रीय आरोग्य प्राधिकरण, रस्ते वाहतूक मंत्रालय, स्थानिक पोलिस, नोंदणीकृत हॉस्पिटल, राज्य सरकारची आरोग्य यंत्रणा, जनरल इन्शुरन्स काऊन्सिल यांच्या समन्वयातून या योजनेची अंमलबजावणी केली जाईल. आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जनआरोग्य योजना (PMJ-Y)Ayushman Bharat Pradhan Mantri Jan -rogya Yojana (PMJAY) या योजनेत कुटुंबाला ५ लाखापर्यंतचा आरोग्य विमा संरक्षण दिले जाते. ही योजना कॅशलेस आणि पेपरलेस पद्धतीने राबवली जाते.

मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट क्र. ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ करिता साहस प्रिंट्स, ६७/बी, रामनगर, पवार कॉलनी, शाहूपुरी, सातारा येथे छापून राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट नंबर ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ येथे प्रसिद्ध केले. संपादक : नरेश विठ्ठल देसाई, दूरध्वनी - ९८३४६८७३६४, ईमेल - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: MAHMAR17902

Printed and Published by Naresh Vitthal Desai on behalf of Rajdand Media Private Limited Plot no. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002 and Printed at Sahash Prints 67/B, Ramnagar, Pawar Colony, Shahupuri, Satara 415002 and Published at Rajdand Media Private Limited Plot No. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002. Editor : Naresh Vitthal Desai, Phone - 9834687364, Email - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: M-HM-R17902

# धर्मादाय हॉस्पिटलच्या विरोधात जनआंदोलन



**मुंबई :** धर्मादाय (चॅरिटी) संस्थेचे सर्व फायदे घेणाऱ्या हॉस्पिटलला मिळालेली जमीन ही कवडीमोल दराने चॅरिटी करण्याच्या हेतूने दिलेली आहे. त्यामुळे आर्थिकदृष्ट्या गरीब रुग्णांना नियमाप्रमाणे सवलतीच्या दरात सेवा देणे बंधनकारक आहे. नवी मुंबईतील सर्व हॉस्पिटल धर्मादाय संस्थेचे नियम काटेकोरपणे पाळतात की नाही? याचे ऑडिट करावे. अन्यथा जन आंदोलन करू असा इशारा मनसे शहर सचिव सचिन कदम यांनी नवी मुंबई महनगरपालिका आयुक्त कैलास शिंदे यांना निवेदन देऊन दिला आहे.

नवी मुंबईतील तेरणा हॉस्पिटल मध्ये नरेंद्र गाडे यांच्या पत्नीचे बाळंतपण झाले होते. गाडे यांचा पत्नीला अनेक वर्षांनंतर जुळी मुले झाली. मुले होण्याचा आनंद व गाडे यांची आत्महत्या तसेच महत्वाचे म्हणजे हॉस्पिटलचे थकीत बिल या सर्व प्रकरणाचा तेरणा हॉस्पिटल प्रशासनाशी काही संबंध आहे का ? असा सवाल करत मनसे आक्रमक होत जन आंदोलन करण्याच्या तयारीत आहे.

धर्मादाय हॉस्पिटलच्या राखीव बेड बाबत माहिती सगळ्या हॉस्पिटलच्या दर्शनी भागात लावावी. तसेच विविध उपचार, शस्त्रक्रिया यांचे दरपत्रक महानगरपालिकेने ठरवावे व ते हॉस्पिटलच्या दर्शनी भागात मराठीत लावावे. अशी मागणी सुद्धा मनसेने केली आहे. पालिकेने यावर तात्काळ ठोस उपाय योजना केल्या नाहीत तर मनसे जन आंदोलन करणार असा इशारा मनसे उपशहर अध्यक्ष सविनय म्हात्रे यांनी दिला आहे .

निवेदन देताना मनसेच्या शिष्टमंडळात पालिका कामगार सेना शहर संघटक आप्पासाहेब कौठुळे, अनिकेत भोपी, अक्षय भोसले, उमेश गायकवाड, निखिल गावडे, मंगेश पाटील, अतिश पाटील, गणेश पाटील, विष्णू कांबळे, मयंक घोरपडे, विष्णू कांबळे, अविनाश फाळके, संदेश पेडणेकर, जालिंदर चव्हाण उपस्थित होते.

## विशाळगड प्रकरणाची सखोल चौकशी करावी

**मुंबई :** विशाळगड अनधिकृत बांधकाम प्रकरण सध्या गाजत असताना असोसिएशन फॉर प्रोटेक्शन ऑफ कैंसिल रिचटिगेट द ट्रोल व सेंटर फॉर स्टडी ऑफ सेक्युलरिजम या संघटनांनी या सर्व प्रकरणाची सखोल चौकशी करावी अशी मागणी मुंबई प्रेस क्लब येथे आयोजित पत्रकार परिषदेत केली.

मुस्लिम समाजाच्या अनेक पिढ्या या ठिकाणी राहतात. त्यांनी जमिनीवर बेकायदेशीरपणे कब्जा केलेला नाही, त्यांच्याकडे जमिनी आणि घरांचे पुरावे , मशिदीची कागदपत्रे व इतर पुरावे असताना हा हल्ला चुकीचा आहे. या भागातील मुस्लिम पुरुष मोठ्या संख्येने परदेशात व मुंबईत काम करतात. सुट्टी व सण असला की गावी येतात . विशाळगडमधील अनधिकृत दुकानाशी त्यांचा काहीही संबंध नसताना त्यांच्यावर हल्ला का ? असा सवाल मोहम्मद गाझी यांनी यावेळी केला.

पोलिस एफआयआरमध्ये नाव असलेल्या नारायण वेल्हार या व्यक्तीच्या घरी एका मोठ्या व्यक्तीच्या पुढाकाराने काही बैठका यापूर्वी झाल्या असल्याची माहिती समोर येत आहे.एफआयआर मध्ये नारायण पांडुरंग वेल्हार यांचे नाव असताना पोलीस ते घेत नाहीत. ती पोलिसांनी दक्षता घ्यायला हवी होती ती घेतलेली नाही अशी माहिती शाकीर शेख यांनी दिली.

# पाटण – संगमनगर रस्त्यासाठी ६ ऑगस्टला अनोखे आंदोलन

### विभागातील पदाधिकाऱ्यांच प्रांताधिकारी, तहसिलदार यांना निवेदन

**पाटण :** गेली सात- आठ वर्षापासून पाटण ते संगमनगर (धक्का) या रस्त्याची प्रचंड दुरवस्था झाली आहे, वेळोवेळी आंदोलनाचा मार्ग पत्करावा लागत आहे, या रस्त्यामुळे प्रवासी नागरिक तसेच वाहन चालक यांना हा त्रास सहन करावा लागत आहे, याची सर्व जबाबदारी संबंधित विभागाची असून त्यांचेवर जोपर्यंत मनुष्यवादाचा गुन्हा नोंद होत नाही व जे नुकसानीस पात्र आहे त्यांची नुकसान भरपाई देत नाही तोपर्यंत कोयना विभागातील जनतेच्या वतीने ६ ऑगस्ट रोजी तीव्र आंदोलन करणार असल्याचा इशारा देत याबाबतचे निवेदन उपविभागीय अधिकारी पाटण, तहसीलदार पाटण यांना देण्यात आले असून या निवेदनाच्या प्रती सहाय्यक कार्यकारी अभियंता राष्ट्रीय महामार्ग उपविभाग सातारा, उपविभागीय पोलीस निरीक्षक पाटण, सहाय्यक पोलीस निरीक्षक कोयनानगर यांना देण्यात आले आहेत.

यावेळी पाटण पंचायत समितीचे माजी सभापती राजाभाऊ शेलार, माजी सदस्य बबनराव कांबळे, युवानेते पंकज गुरव, बाळासाहेब कदम, बापू देवळेकर, संजय कांबळे उपस्थित होते.

निवेदनात म्हटले आहे की पाटण ते संगमनगर (धक्का) या दरम्यानच्या रस्त्याची गेले सात आठ वर्षापासून पावसाळ्यात प्रचंड दुरवस्था होत असते, आम्हास दरवेळी आंदोलनाचा मार्ग पत्करावा लागत आहे .संबंधित विभाग व ठेकेदार यांनी सर्वसामान्यांना व वाहनधारकांना त्रास देऊन त्यांचे आर्थिक नुकसान केले आहे. छोटे-मोठे दुकानदार, व्यापारी यांनाही नाहक त्रास झाला आहे, मणक्याचा त्रास ,अपघात होणे, वाहनाचे नुकसान होणे असे अनेक प्रसंगाला लोकांना सामोरे जावे लागले आहे, यास जबाबदार संबंधित विभाग असून त्यांचेवर जोपर्यंत मनुष्यवादाचा गुन्हा नोंद होत नाही व जे नुकसानीस पात्र आहे त्यांना नुकसान भरपाई देत नाही तोपर्यंत तीव्र आंदोलन सुरू राहणार आहे. यासाठी मंगळवार दिनांक ४ रोजी सकाळी ११ वाजता संगमनगर (धक्का) येथे रास्ता रोको व अनोख्या प्रकारचे आंदोलन करणार आहे असा इशारा देण्यात आला आहे. निवेदनावर

राजाभाऊ शेलार बबन कांबळे, पंकज गुरव, बाळासाहेब कदम, रमेश जाधव, बापू देवळेकर, राजेश पवार, मनीष चौधरी, मंगल माने, संजय कांबळे, रवींद्र देसाई, अनुप मोहिते, सत्यजित शेलार, ज्ञानदेव कदम, शंकर काटे यांच्या सह्या आहेत.

# मतदार यादीतून राजकीय हेतूने नावे वगळल्यास त्याची पूर्णता जबाबदारी प्रशासनाची : उद्धव ठाकरे शिवसेना तालुकाप्रमुख सचिन झांजुर्णे



**कोरेगाव :** कोरेगाव खटाव विधानसभा मतदारसंघातील मतदारांची नावे वगळण्या साठी विहित पुरावे न जोडता कोरेगाव रहिवासी नसलेल्या संजय काटकर नावाच्या इसमाने बेकायदेशीररित्या सादर केलेली यादी म्हणजे राजकीय हेतूने वगळण्याचा घातलेला घाट आहे, मतदान हा राजकीय राज्यघटनेने दिलेला मूलभूत अधिकार आहे. बेकायदेशीर अर्जास जबाबदार असणाऱ्या व्यक्तीवर फौजदारी स्वरूपाचे गुन्हे दाखल करावेत. तसेच पात्र मतदार मतदाना पासून वंचित राहिल्यास त्याची पूर्णतः जबाबदारी प्रशासनाची राहील असा इशारा शिवसेनाउद्धव ठाकरे गटाचे कोरेगाव तालुका प्रमुख सचिन झांझूर्णे व पदाधिकाऱ्यांनी निवेदनाद्वारे कोरेगावच्या तहसीलदार डॉक्टर संगमेश कोडे यांना दिला.

कोरेगाव तहसीलदार डॉक्टर संगमेश कोडे यांना दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, सध्या कोरेगाव खटाव मतदार संघातील मतदार यादीचे पुनर्नरीक्षण अभियान चालू आहे. मतदारांची नावे वगळण्यासाठी संजय काटकर यांनी मतदार यादीतील नाव वगळण्यासाठी जे पुरावे अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. ते जोडलेले नाहीत. राजकीय हेतूने मोघम नावे टाकून वगळण्याचा घाट घातला आहे. तसेच संबंधित व्यक्तींना किमान आठ दिवस आधी पूर्व सूचना देणे आवश्यक आहे. जर चुकीच्या पद्धतीने मतदार यादीतून नावे वगळली गेल्यास संबंधित मतदार मतदानापासून वंचित राहणार आहे. मतदान हा राजकीय राज्यघटनेने दिलेला मूलभूत अधिकार आहे. अशा पद्धतीने मतदानापासून वंचित ठेवल्यास, जबाबदार असणाऱ्या व्यक्तीवर फौजदारी स्वरूपाचे गुन्हे दाखल करावेत. तसेच पात्र मतदार मतदानापासून वंचित राहिल्यास त्याची पूर्णतः जबाबदारी प्रशासनाची राहील. तरी या विषयाची प्रशासनाने गांभीर्याने दखल घ्यावी, व अनुचित प्रकार टाळावेत अशी मागणी निवेदनाद्वारे केली आहे.

# अनिल देशमुख यांच्या विरोधात सीबीआयकडे सबळ पुरावे : सचिन वाझे

**मुंबई :** कारागृहात असलेले बडतर्फ पोलीस अधिकारी सचिन वाझे यांनी, तत्कालीन गृहमंत्री अनिल देशमुख यांच्या विरोधातील सबळ पुरावे केंद्रीय अन्वेषण विभागाकडे आहेत. तसेच विद्यमान गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे आपण पुराव्यांसह देशमुख यांच्यावर केलेल्या आरोपांची लेखी माहिती दिली आहे, असे वृत्तसंस्थेशी बोलताना सांगितले. त्यांच्या या विधानामुळे राज्याच्या राजकारणात आरोप प्रत्यारोपांचा धुरळा उडणार आहे.

गृहमंत्री पदाच्या कार्यकाळात आर्थिक गैरव्यवहारांचे आरोप असलेले आणि जामीनावर बाहेर असलेले अनिल देशमुख यांनी काही दिवसांपूर्वी देवेंद्र फडणवीस यांच्यावर आरोप केले आहेत. सक्तवसुली संचालनालयाच्या कारवाईपासून वाचवण्यासाठी देवेंद्र फडणवीस यांनी आपल्याला तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, मंत्री आदित्य ठाकरे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर शपथपत्राद्वारे आरोप करण्यास सांगितले. मात्र, आपण त्याला दाद लागू दिली नाही, असा दावा देशमुख यांनी केला आहे.

या पार्श्वभूमीवर शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी, फडणवीस यांच्या बाबतीत, एक तर तू राहशील किंवा मी राहीन, अशी टोकाची भाषा वापरली आहे. विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर महाविकास आघाडी आणि महायुती यांच्यात आरोप प्रत्यारोपांच्या फैरी झडत आहेत. हे आरोप प्रत्यारोप केवळ राजकीय स्वरूपाचे न राहता ते व्यक्तिगत पातळीवर आले आहेत.

तशातच तळोजा कारागृहात असलेले सचिन वाझे मुंबईतील रुग्णालयात तपासणीसाठी आले असता वृत्तसंस्थेशी बोलताना त्यांनी केलेल्या विधानांमुळे महायुती आणि महाविकास आघाडी यांच्यातील शिमगा आणखीनच रंगणार आहे.

कायमच वादग्रस्त ठरलेले पोलीस अधिकारी वाझे हे १०० कोटी रुपयांच्या खंडणीसह मनसुख हिरेन खून प्रकरण आणि उद्योगपती मुकेश अंबानी यांचे निवासस्थान असलेल्या या इमारतीच्या बाहेर स्फोटकांनी भरलेली गाडी लावून ठेवण्याच्या प्रकरणात आरोपी आहेत. तत्कालीन गृहमंत्री अनिल देशमुख यांनी मुंबईतील बार आणि पबचालकांकडून शंभर कोटीची वसुली करण्याचे काम आपल्याला दिल्याचा दावा वाझे यांनी केला आहे.

## वदंगलखोरांच्या चिथावणीला बळी पडू नका: आंबेडकर यांचे ओबीसी समाजाला आवाहन

**नांदेड :** आरक्षणाच्या मुद्द्यावरून मराठा आणि इतर मागासवर्गीय यांच्या तणाव निर्माण झालेला असताना त्याचा गैरफायदा घेऊन काहीजण दंगली भडकावण्यासाठी चिथावणी देण्याचा प्रयत्न करतील. अशा चिथावणीला बळी पडू नका. राज्यात शांतता राखण्यासाठी सहकार्य करा, असे आवाहन वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी केले आहे.

मराठा समाजाला इतर मागास प्रवर्गातून आरक्षण द्यावे आणि कुणबी प्रमाणपत्र मिळालेल्या घटकांच्या सगे सोयाऱ्यानाही आरक्षणात सामावून घ्या, अशा मराठा आरक्षण आंदोलकांच्या आग्रही मागणी आहे. मात्र, या मागण्या मान्य झाल्यास इतर मागासवर्गीय समाजाला आरक्षणात कोणताच वाटा मिळणार नाही, अशा धास्तीने हा समाजही आरक्षण बचाव ही भूमिका घेऊन रस्त्यावर उतरला आहे. या वादात ओबीसींचे आरक्षण धोक्यात आल्याची भूमिका घेऊन आंबेडकर यांनी आरक्षण बचाव यात्रा काढली आहे.

या दोन्ही आंदोलनामुळे गावागावात मराठा समाज आणि इतर मागासवर्गीय समाज यांच्यात दुफळी निर्माण झाली आहे. या परिस्थितीचा गैरफायदा घेऊन दोन्ही समाजातील तरुणांना भडकवून दंगली घडवून आणण्याची शक्यता आहे. मात्र, अशावेळी कोणी दंगल करण्यास सांगत असेल तर त्यांना आधी तुम्ही आपल्या मुलांना दंगल करण्यासाठी पाठवा, असे प्रत्युत्तर द्या, असेही आंबेडकर म्हणाले.

आरक्षण देण्याचे काम सरकार करणार असले तरीही सरकारने दिलेले आरक्षण कायदेशीर दृष्ट्या योग्य आहे की अयोग्य हे ठरवणचे काम न्यायालय करणार आहे. त्यामुळे दंगली घडविण्यासारख्या भानगडी कडून सरकारवर दबाव आणण्याचा प्रयत्न करू नका, असेही आंबेडकर यांनी सांगितले. छत्रपती संभाजीनगर येथे मोठ्या संख्येने उपस्थित राहून ही यात्रा यशस्वी झाल्याचे दाखवून द्या, असे आवाहनही आंबेडकर यांनी केले.

## राहुल गांधी यांच्यावर हल्ला करण्याचा सत्ताधाऱ्यांचा डाव: संजय राऊत यांचा आरोप

मुंबई: विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि इंडिया आघाडीच्या महत्त्वाच्या नेत्यांवर हल्ले करण्याचा सत्ताधाऱ्यांचा डाव आहे. त्यासाठी परदेशात कट रचला जात आहे. पुढच्या काही काळात आमच्यावर हल्ले होऊ शकतात, असा गंभीर आरोप शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केला आहे.

राहुल गांधी मागील काही काळापासून आक्रमकपणे सरकारला आरसा दाखविण्याचे काम करत आहेत. त्यामुळे त्यांच्यावर कारवाई केली जाण्याची शक्यता आहे. मात्र, विरोधकांची त्यासाठी तयारी आहे. केंद्रातील राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे सरकार अल्पमतात आहे. तरीही पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांनी असंवैधानिक कामे करण्याचे सोडले नाही, अशी टीका राऊत यांनी केली आहे. इंडिया आघाडीने सत्ताधाऱ्यांना पिछाडीवर टाकले आहे. त्यामुळे भाडोत्री गुंडांकडून आमच्यावर हल्ले होऊ शकतात, असा दावाही त्यांनी केला.

# भाटघर धरण १०० टक्के भरले..नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा



**भोर :** भोर तालुक्यात मागील पंधरा दिवसांपासून जोरदार पर्जन्यवृष्टी सुरू असल्याने शुक्रवार (दि.२) सकाळी आकरा वाजता भाटघर धरण १०० टक्के भरल्याने धरणाचे ४५ स्वयंचलित दरवाजातून १८ हजार ५४० क्युसेक्स नीरा नदीत विसर्ग सुरु करण्यात आला.

पुणे जिल्ह्यातील सर्वात जास्त २४ टीएमसी पाणीसाठा असणारे भोर तालुक्यातील ब्रिटिश कालीन भाटघर धरण आहे. गेल्या वर्षी २० सप्टेंबरला धरण पुर्ण क्षमतेने भरले होते. मात्र, यावर्षी धरण दिड महिना लवकर भरले. धरणाच्या टप्प्या टप्याने ४५ स्वयंचलित दरवाजातून १८ हजार ५४० क्युसेक्स पाण्याचा विसर्ग नीरा नदीत सुरू आहे. यामुळे नदीकाठच्या गावांनी सतर्कता बाळगावी असे आवाहन जलसंपदा विभागाने केले आहे.

भाटघर धरण क्षेत्रात मागील पंधरा दिवसांपासून पाऊसाचा जोर कायम आहे. त्यामुळे धरणाच्या पाणी साठ्यात झपाट्याने वाढ झाली. मान्सून सुरू झाल्या नंतर एक महिन्यात धरण साखळीतील पाण्यात वाढ होऊन भाटघर धरणात ६० ते ६५ टक्के पाणीसाठा झाला होता. यानंतर जुलै महिन्याच्या शेवटच्या पंधरा दिवसांपासून सुरू असलेल्या जोरदार पावसामुळे पाणी साठ्यात झपाट्याने वाढ झाली आणि आज शुक्रवार (दि.२) ऑगस्टला धरण १०० टक्के भरले.

भाटघर धरणाला एकूण ८१ दरवाजे असून यातील स्वयंचलित ४५ दरवाजातून विसर्ग सुरू आहे.धरणाच्या वीजनिर्मिती केंद्रातून व स्वयंचलित दरवाज्यामधून पाण्याचा विसर्ग सुरु असल्याने नीरा नदी दुथडी भरुन वाहत आहे. त्यामुळे नदीकाठच्या गावांतील नागरिकांना सतर्कतेचा इशारा प्रशासना कडून देण्यात आला आहे.भाटघर धरण भरल्याने वर्षभराचा पिण्याच्या पाण्याचा व शेतीसाठी आवश्यक पाण्याचा प्रश्न सुटणार असल्याने निरा खोऱ्यातील शेतकरी समाधान व्यक्त करीत आहेत.तर भाटघर धरण ओव्हर फ्लो होऊन ४५ स्वयंचलित दरवाजांमधून विसर्ग सुरू झाल्याने धरणातील पाण्याचा विसर्ग पाहण्यासाठी पर्यटकांची मोठी गर्दी वाढन्याची शक्यता आहे.

### नीरा देवघर ९४ टक्के भरले

विशेषतः पंधरवड्यातील पावसामुळे नीरा देवघर धरणातील पाणीसाठा वाढला असून फक्त अद्याप भरणे बाकी असून सध्या धरणात ९४ टक्के पाणीसाठा आहे. पुढील ४८ तासात तेही भरण्याची शक्यता आहे.

# दौंडमधे लोकशाहिर आणाभाऊ साठे जयंती समारंभ जोरदारपणे साजरा



**दौंड :** प्रृथी ही शेषाचे मस्तकावर तरलेली नसुनती ती दलित, कष्टकरी आणि ऊपेक्षीत यांच्या तळहातावर तरलेली आहे. असा क्रांती कारक आणि परीवर्तन शील महान विचार देणारे लोक शाहिर अण्णा भाऊ साठे यांचा जयंती समारंभ दौंड शहरात उस्ताहआणी जल्लोष पुर्ण. वातावरणात साजरी करण्यात आली.

दौंड येथील अण्णा भाऊ साठे स्मारक समिती, अण्णा भाऊ साठे स्मारक संस्था, दौंडनगर पालीचा, अण्णा भाऊ साठे पुतळा समिती, आणि अन्य विवीध संस्था यांचे संयुक्त वतीने दौंड येथील अणणा भाऊ साठे बागेत जयंती समारंभ आयोजित करण्यात आला होता.

या निमित्त रक्त दान शिबीर, कार्यकर्ते आणि विषेस कार्य करणारे. कार्यकर्ते यांना पारितोषिक , विवीध समाज हितावह उपक्रम आयोजीत करण्यात आले होते.

या कार्यक्रमात माजी आमदार रमेश थोरात यांनी अण्णा भाऊ यांच्या साहित्य आणि शाहिरी या बाबत आपल्या भाषनातून विचार व्यक्त केले .

यावेळी नगर पालीकेचे मुख्य्कारी सुषमा शिंदे, पोलिस निरीक्षक संतोष डोके, नामदेव ताकवणे, नागसेन धेंडे, अनिश सोनवणे, अश्विन वाघमारे, बादशहा शेख, आप्पा पवार , बी.वाय. जगताप या मान्यवर यांचं सह कार्यकर्ते आणि नागरीक उपस्थीत होते. या वेळी येथील साठे बागेत अण्णा भाऊ साठे यांचा पुर्णा क्रुती पुतळा उभारावा, बाग सुशोभित करावी. या बाबत मागणी करण्यात आली.

# सरकारच्या विरोधात रहिवाशांचा आंदोलनाचा इशारा




**मुंबई :** झोपडपट्टी पुनर्विकास बाबत सरकार गंभीर नाही. अनेक वर्षापासून कुर्ला (पश्चिम) येथील संदेश नगर व क्रांती नगर येथील रहिवाशी सरकारच्या मनमानी कारभाराला कंटाळले आहेत. त्यामुळे सरकारने आता जर याप्रकरणी गांभीर्याने लक्ष दिले नाही तर ५ ऑगस्टला आझाद मैदानात बेमुदत उपोषण करणार असल्याचा इशारा

मुंबई झोपडपट्टी चळवळ व एकता समाज कल्याण सेवा संस्थेचे अध्यक्ष घनश्याम भापकर यांनी शुक्रवारी मुंबई मराठी पत्रकार संघ येथे आयोजित पत्रकार परिषदेत दिला.

एच.डी.आय.एल. प्रिमियर, विद्याविहार येथील बांधलेल्या इमारती कुर्ला (पश्चिम) येथील संदेश नगर व क्रांती नगरच्या रहिवाशांच्या हक्काच्या आहेत. परंतु सद्या एम एम आर डी ए ने ३० पैकी फक्त ३ इमारती या रहिवाशांना दिल्या आहेत. संदेश नगर, क्रांती नगरच्या सर्व झोपड्यांची संख्या ३७४७ असताना फक्त ३ इमारती कशा दिल्या गेल्या ? असा सवाल घनश्याम भापकर यांनी यावेळी केला.

एच.डी.आय.एल. विद्याविहार प्रकल्प हा या ठिकाणी राहणाऱ्या जनतेच्या नावांवर उभारला आहे. त्यामुळे कोणाच्याही मनमानीनुसार इमारतीचे वितरण होऊ देणार नाही. असे सांगत भापकर म्हणाले, २९ व ३० या क्रमांकाच्या इमारतीत संदेश नगर व क्रांती नगरचे पुर्नवसन झालेच पहिजे. तसेच करोडो रुपयांची जमीन केंद्र शासनाला हवी असेल तर मुंबई अंतरराष्ट्रीय विमानतळ प्राधिकरण (अदानी कंपनी ) ला आमच्या पात्र व अपात्र झोपड्यांचे पुर्नवसनासाठी लागणारा सर्व खर्च दयावे लागेल अशी मागणी भापकर यांनी केली.

# तासगावची बाजार समिती शेतकऱ्यांची राहिलीय का ..?

## ५०० ग्रॅम बेदाण्याची तुट झाली ७५० ग्रॅम, शेतकऱ्यांशी चर्चा न करताच निर्णय



तासगाव : तासगाव येथे गुरुवारी बेदाणा उधळणी बाबत झालेल्या चर्चेत शेतकऱ्यांना न बोलवता ५०० ग्रॅम असलेली तूट आता ७५० ग्रॅम करण्याचा निर्णय तासगाव बाजार समिती, व्यापारी व अडत दुकानदार यांनी घेतला आहे. शेतकऱ्यांना न बोलवता त्याच्या मालाची तूट परस्पर ठरवून तासगाव बाजार समिती ही आता शेतकऱ्यांची राहिली नसून ती व्यापाऱ्यांची झाली असल्याचे बोलले जात आहे.

सांगली जिल्ह्यात तासगाव, मिरज, पलूस जत कवठेमहांकाळ, वाळवा आदी तालुक्यात मोठ्या प्रमाणात द्राक्ष पिक घेतले जाते. पिकवलेल्या द्राक्षा पैकी ४० ते ५० टक्के द्राक्षापासून बेदाणा केला जातो. तासगाव ही बेदाण्याची मोठी बाजारपेठ आहे. मात्र मुठभर व्यापारी व दलालांच्या ताब्यात हा व्यवसाय आहे. दर पाडने , दर चढ़वने हे व्यापारी करतात. बेदाना मोठ्या प्रमाणात उधळला जातो. त्याचे नुकसान शेतकऱ्यांनाच सोसावे लागते.

तसेच बेदान्याचे पेमेंट वेळेवर दिले जात नाही. २३ दिवसात पेमेंट देने बंधनकारक असताना ४० ते ५० दिवस पेमेंट मिळत नाही. बेदाणा बॉक्समधील कलमाची तूट अडीचशे ग्रॅम वरून पाचशे ग्रॅम झाले तर गुरुवारी बाजार समिती व्यापारी व आडतदार यांच्या बैठकीत ते अडीचशे ग्रॅमने वाढून साडेसातशे ग्रॅम झाली. दोन दोन किलोची तूट नियम फाट्यावर मारून केली जात आहे.

मुळात बेदाणा उधळण व त्यासंबंधी प्रश्नांची चर्चा करण्यासाठी जो बेदाणा उत्पादक शेतकरी आहे. त्याला बोलवणे हे बाजार समितीचे काम होते.

मात्र तासगाव बाजार समितीने व्यापारी व अडतदार यांना बोलावून बेदाणा उधळण व कलमातील तूट किती धरायची यावरती चर्चा करून हा निर्णय घेतला हा गंभीर प्रकारातून तासगावची बाजार समिती ही आता शेतकऱ्यांची राहिली नसून ते व्यापाऱ्यांची झाली



आहे. व्यापाऱ्यांना अनुकूल असे निर्णय घेताना

शेतकऱ्यांचे पिकवलेल्या मालाचे मालक ही मंडळी झाली आहे का असा सवाल शेतकऱ्यांमधून विचारला जात आहे.

### शेतकऱ्यांची पोरं उठली शेतकऱ्यांच्या मुळावर : अमोल काळे

**तासगाव तालुक्यात द्राक्षाचे मोठे क्षेत्र असून व्यापाऱ्यांकडून द्राक्ष शेतकऱ्यांची फसवणूक बेदाण्याची उधळण त्याचे पेमेंट व बेदाण्याची सूट हे गंभीर प्रश्न शेतकऱ्यांपुढे आहेत. तासगाव बाजार समितीचे संचालक असणारी मंडळी ही बऱ्यापैकी शेतकऱ्यांची मुले आहेत. मात्र तासगाव बाजार समितीत व्यापाऱ्यांच्याकडून बेदाण्याची होणारी उधळण, वेळेत न मिळणारे पेमेंट व तूट यावर ही मंडळी तोंडातून 'ब्र शब्द' काढताना दिसत नाहीत. शेतकऱ्यांच्या प्रश्नावर चर्चा करायला शेतकऱ्यांना न बोलावून शेतकऱ्यांची पोरंच शेतकऱ्यांच्या मुळावर उठल्याचा आरोप मनसे नेते अमोल काळे यांनी केला.**

## क्राईम

### वेगवेगळ्या घटनांमध्ये दोन जण बेपत्ता

**सातारा :** सातारा शहरासह तालुक्यात घडलेल्या दोन वेगवेगळ्या घटनांमध्ये दोन जण बेपत्ता झाल्याच्या फिर्यादी संबंधित पोलीस ठाण्यांमध्ये नोंदविण्यात आल्या आहेत.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. ३१ रोजी सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास तात्याबा रावजी कुरळे रा. कुरूळबाजी, पोस्ट रोहोट, ता. सातारा हे राहत्या घरातून कोणास काही एक न सांगता निघून गेले आहेत. अधिक तपास सहाय्यक फौजदार वायदंडे करीत आहेत.

दुसऱ्या घटनेत, दिनांक ३१ रोजी प्रकाश रामा वाघमारे रा. विकास नगर, सातारा हे राहत्या घरातून निघून गेले आहेत. अधिक तपास महिला पोलीस हवालदार भवारी करीत आहेत.

### सुमारे ६ लाखांच्या फसवणूक प्रकरणी दोघांवर गुन्हा

**सातारा :** नोकरीच्या आमिषाने दोघांची सुमारे सहा लाखांची फसवणूक केल्याप्रकरणी दोघांवर सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. ३ ऑक्टोबर २०२३ ते ८ जून २०२४ दरम्यान ऋषिकेश धनाजी गावडे रा. गोखळी, ता. फलटण जि. सातारा आणि त्यांच्या मित्रास सातारा जिल्हा परिषदेमधील आरोग्य विभागात नोकरी लावतो, असे आमिष दाखवून त्यांची आकाश संभाजी कोळी आणि अमित अशोक माने दोन्ही रा. चरेगाव, ता. कराड, जि. सातारा यांनी एकूण ६ लाख ५ हजार रुपयांची फसवणूक केल्याबाबतची फिर्याद सातारा शहर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे. अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक बिले करीत आहेत.

### वाढे फाटा येथून दुचाकीची चोरी

**सातारा :** वाढे फाटा येथून अज्ञात चोरट्याने दुचाकीची चोरी केल्याची फिर्याद सातारा शहर पोलीस ठाण्यात नोंदविण्यात आली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. २७ जुलै रोजी रात्री साडेनऊ ते साडेदहा वाजण्याच्या दरम्यान वैभव विलास खवळे रा. कोडोली, ता. सातारा यांची दुचाकी क्र. एमएच ११ एएक्स ४१७१ अज्ञात चोरट्याने साई ढाबा, वाढे फाटा येथून चोरून नेली आहे. अधिक तपास महिला पोलीस नाईक सपकाळ करीत आहेत.

### मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी चारचाकी चालकावर गुन्हा

**सातारा :** एकाच्या मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी चारचाकी चालकाविरुद्ध सातारा तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. २४ जून रोजी दुपारी सव्वा वाजण्याच्या सुमारास सातारा-परळी रस्त्यावर संतोष प्रताप जाधव रा. करंडी, ता. सातारा यांनी त्यांच्या ताब्यातील मालवाहतूक गाडी क्र. एमएच ११ सीजे २७७४ भरधाव वेगात चालवून समोरून येणाऱ्या प्लेटिना मोटरसायकल क्र. एमएच ११ एएच १३०२ ला जोरदार समोरासमोर धडक दिली होती. या अपघातात शंकर भगवान माने रा. आंबवडे खुर्द, पोस्ट जकातवाडी, ता. सातारा हे गंभीर जखमी झाले होते. त्यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. अधिक तपास पोलीस हवालदार वायदंडे करीत आहेत.

### दानपेटीतील रकमेची चोरी; तीन अज्ञातांवर गुन्हा

**सातारा :** मल्हार पेठ, सातारा येथील दर्गा मधील दानपेटीतील रकमेची चोरी केल्याप्रकरणी तीन अज्ञातांविरोधात सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. ३१ जुलै ते एक ऑगस्ट दरम्यान गौस पाक दर्गा, मल्हारपेठ, सातारा येथील दानपेटी फोडून त्यातील सुमारे ८ हजार रुपये (नोटा आणि चिल्लर) अज्ञात तीन चोरट्यांनी चोरून नेली आहे. अधिक तपास महिला पोलीस हवालदार पवार करीत आहेत.

### युवकास मारहाण केल्याप्रकरणी तिघांवर गुन्हा

**सातारा :** युवकास मारहाण केल्याप्रकरणी तिघां विरोधात शाहूपुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. १ रोजी सकाळी साडेअकरा वाजण्याच्या सुमारास रजनी क्लासच्या समोर अक्षय चंद्रशेखर जाधव रा. सदर बाजार, सातारा या युवकास लोखंडी रॉड तसेच दगडाने मारहाण केल्याप्रकरणी गौतम कांबळे, प्रेमराज आणि एक अनोळखी इसम (पूर्ण नाव, पत्ता माहीत नाही) यांच्या विरोधात शाहूपुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

## तारळी धरणग्रस्तांचे ५ ऑगस्टपासून साताऱ्यात बेमुदत आंदोलन

**सातारा :** सातारा जिल्ह्यातील तारळी धरणग्रस्तांचे अद्याप योग्य पुनर्वसन झालेले नाही. सुमारे ५५० खातेदारांचे पुनर्वसन लाल फितीच्या कारभारात अडकले आहे. तारळीच्या लाभक्षेत्रामध्ये जमिनी उपलब्ध असतानाही पुनर्वसन विभागाकडून आढावा बैठकीला विलंब केला जात आहे. जिल्हा पुनर्वसन विभाग धरणग्रस्तांच्या मागणी संदर्भात संवेदनशील नाही या निषेधार्थ तारळी धरणग्रस्त ५ ऑगस्ट रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर बेमुदत आंदोलन करणार आहेत असा इशारा श्रमिक मुक्ती दल समतावादीचे राज्य संघटक डॉ. प्रशांत पन्हाळकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

येथील शासकीय विश्रामगृहामध्ये त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला .पन्हाळकर पुढे म्हणाले तारळी प्रकल्पाच्या धरण क्षेत्रामध्ये १४ गावे येतात त्यांचे कराड, पाटण, माण, खटाव या चार तालुक्यांमध्ये पुनर्वसन करावयाचे आहे एकूण खातेदार १९०० असून पैकी ५५० खातेदारांचे पुनर्वसन बाकी आहे. यामध्ये गेल्या २३ वर्षापासून धरणग्रस्तांच्या संकलन दुरुस्त्या झालेल्या नाहीत अपर जिल्हाधिकारी जीवन गलांडे यांनी जिल्हा पुनर्वसन विभागाला बैठकीचे आदेश देऊनही त्याच्याकडे कानाडोळा करण्यात आल्याचा आरोप पन्हाळकर यांनी केला. पुनर्वसन कार्यालयाची भूमिका संशयास्पद असून प्रकल्पग्रस्तांच्या जमिनीसाठी एजंट म्हणून कार्यालयातलेच कर्मचारी काम करतात ज्यांच्याकडून जमीन खरेदी केली जाणार आहे त्यांच्याकडेच धरणग्रस्तांना पाठवले जाते त्यांना जमीन विकण्यात भरीस पाडून मगच त्यांना मान्यतेचे दाखले दिले जातात असा गंभीर आरोप पन्हाळकर यांनी केला.

कराड, पाटण, माण, खटाव या चार तालुक्यांमध्ये धरणग्रस्तांच्या पुनर्वासासाठी भूखंड असतानाही पुनर्वसन विभागाने गेल्या दोन वर्षापासून बैठकाच घेतलेल्या नाही. या सर्व घटनांच्या निषेधार्थ तारळी धरणग्रस्तांच्या लाभक्षेत्रातील ५५० धरणग्रस्त जिल्हाधिकारी कार्यालयावर ५ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता बेमुदत धरणे आंदोलन करणार आहेत. हे आंदोलन शाहू चौकातील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करून सुरू केले जाणार आहे. तेथून धरणग्रस्त मोर्चाने जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रवेशद्वारावर धरणे आंदोलन करून जिल्हा प्रशासनाला निवेदन सादर करणार आहेत. उरमोडी व तारळीच्या लाभक्षेत्रात असलेल्या मान खटाव तालुक्यातील जमिनी व जांभे चिखली ठोसेघर येथील नियोजनात नसलेले ३५३ तारळी प्रकल्पग्रस्तांचे नियोजन केल्याशिवाय या जमिनी इतर प्रकल्पासाठी वर्ग करण्यात येऊ नये अशी मुख्य मागणी त्यांनी केली आहे धरणग्रस्तांच्या पुनर्वसनांमध्ये २५ खातेदार बोगस असल्याचाही आरोप त्यांनी केला.

## तर राजकारण सोडून घरी बसू

### अजित पवार यांचे विरोधकांना आव्हान

**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये बंड पुकारून महायुती बरोबर जाण्यापूर्वी गृहमंत्री आणि भारतीय जनता पक्षाचे रणनीतीकार अमित शहा यांना भेटण्यासाठी आपण वेशांतर करून दिल्लीला जात असल्याची आवई केवळ आपल्याला बदनाम करण्यासाठी उठविली जात आहे. ही वेशांतराची बाब सिद्ध झाली, तर आपण राजकारण सोडून घरात बसून राहू, असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी स्पष्ट केले आहे.

अमित शहा यांना भेटण्यासाठी दिल्लीला जाताना आपण वेशांतर करून टोपी घालून, मास्क लावून आणि विमानाच्या तिकिटासाठी दुसरेच नाव देऊन प्रवास करत असू, असे खुद्द अजित पवार यांनीच प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या निवासस्थानी पत्रकारांशी अनौपचारिक गप्पा मारताना सांगितल्याची वृत्त काही काळापूर्वी प्रसिद्ध झाली. त्यानंतर शिवसेना उद्धव ठाकरे गट आणि अर्थातच राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष यांच्याकडून अजित पवार यांना टीकेचे लक्ष्य करण्यात आले. मात्र, अजित पवार यांनी वेशांतराचा प्रकार सपशेल नाकारला आहे.

आपल्याला लपून-छपून राजकारण करण्याची सवय नाही. जिथे कुठे जायचे तिथे उजळ माथ्याने छाती ठोकपणे जाऊ. सध्या आपल्या बदनामीची मोहीम राबवली जात आहे. महायुती सरकारच्या अनेक चांगल्या योजना येत आहेत आणि त्याला जनतेकडून उदंड प्रतिसाद मिळत आहे. त्यामुळे पायाखालची वाळू सरकलेल्या विरोधकांकडून खोटी कथिते अर्थात फेक नॅरेटिव्ह पसरवली जात आहे. आपल्यावरील वेशांतराचा आरोप हा त्याचाच एक भाग आहे. जर हा आरोप सिद्ध झाला तर आपण राजकारण सोडून देऊ, असे पवार म्हणाले.

सध्या सकाळचां जो भोंगा वाजतो त्याच्याकडून उचलली जीभ लावली टाळ्याला, असा प्रकार सुरू आहे, अशा शब्दात पवार यांनी नाव न घेता शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांना टोला लगावला.

## पालिकेच्या पाच सफाई कामगारांची वारसा हक्काने नियुक्ती

**सातारा :** साहित्यरत्न लोकशाहिर अण्णाभाऊ साठे यांची १०४ वी जयंती निमित्त साधून सातारा नगर परिषदेमधील लाड व पागे कमिटीच्या शिफारशीनुसार श्रीमती वनिता भिसे, विजय तुपे, सचिन आवळे, राजू वायदडे, बागणीकर पाच सफाई कामगारांच्या वारसांना वारसाहक्काने आज दिनांक १/८/२०२४ रोजी नियुक्ती आदेश देण्यात आले.

सदरच्या नेमणुका औरंगाबाद खंडपीठाने स्थगिती दिल्यामुळे दिड वर्षे प्रलंबित असलेने संबंधित वारसावर अन्याय झाला होता. परंतु अखिल भारतीय सफाई मजदूर काँग्रेसने वकिलामार्फत याचिका दाखल करून सफाई कामगारांचे लाड व पागे कमिटीच्या शिफारशीनुसारचे दि.१२ ऑगस्ट १९७५ ते दि. २४ फेब्रुवारी २०२३ चे सर्व शासनाने शासन परिपत्रक व शासन निर्णय औरंगाबाद खंडपीठास सादर करून पाठपुरावा व प्रयत्न केल्याने औरंगाबाद खंडपीठाने दि. २४/६/२०२४ रोजी स्थगिती उठवल्याने आज नियुक्ती आदेश देण्यात आले आहे. तसेच नियुक्ती आदेश देण्याकरिता अभिजीत बापट, मुख्याधिकारी व श्री. मनोज बिवाल आस्थापना विभागाचे सर्व पदाधिकारी व अधिकारी यांचे मोलाचे सहकार्य मिळाल्याने सर्व संघटनेचे वतीने आभार मानण्यात आले.

## महिलांच्या सुरक्षेसाठी लव जिहाद विरोधी कायदा करा

### हिंदू जनजागृती समितीचे साताऱ्यात आंदोलन




**सातारा :** महाराष्ट्रामध्ये एकीकडे लाडकी बहीण योजना राबवली जात असताना दुसरीकडे महाराष्ट्रातील महिला लव जिहाद सारख्या प्रकारांना बळी पडत आहे. उरण येथील यशस्वी शिंदेची निघृण हत्या करणाऱ्या लव जिहादवाल्याला भर चौकात फाशी द्या आणि राज्य शासनाने लव जिहाद विरोधी कायदा तातडीने अमलात आणावा अशी मागणी हिंदू जनजागृती समितीच्या वतीने करण्यात आली.

यावेळी भर पावसात जिल्हाधिकारी कार्यालय धरणे आंदोलन करण्यात आले या आंदोलनामध्ये हिंदू महासभेचे जिल्हाध्यक्ष धनराज जगताप, विश्व हिंदू परिषदेचे माजी मंत्री जितेंद्र वाडकर, जनार्दन करपे, अधिवक्ता धनंजय चव्हाण, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रकाश शहाणे, जितेंद्र धमाले, अस्मिता फडतरे, दुर्गा माता मंदिर पंचपाळी होत विश्वस्त संस्थेचे अध्यक्ष हिमांशु निकम, विश्वास सावरकर, जकातवाडी येथील ग्रामस्थ निलेश भोसले आणि इतर ५० हिंदुत्ववादी कार्यकर्त्यांनी आंदोलनात भाग घेतला होता.

उरण पनवेल मार्गावरील येणा-या स्कूलच्या समोर राहणारी यशस्वी शिंदे यांची निघृण हत्या करण्यात आली. या प्रकारामुळे केवळ महाराष्ट्रातल्या विविध भागासह देशात संताप व्यक्त होत आहे. श्रद्धा वालकर खून प्रकरणाची आठवण यानिमित्ताने पूर्ण देशाला झाली आहे. उरणमधील युवती बरोबर घडलेली घटना अतिशय सुन्न करणारी आहे. हिंदू युवतीमध्ये दहशत निर्माण करण्यात येत आहे ही केवळ घटना नसून श्रद्धा वालकर रूपाली चंदनशिवे सोनम शुक्ला या अनेक हिंदू मुलींना लक्ष करण्यात आले आहे त्यामुळे या प्रकारांना आळा घालण्यासाठी कठोर कायदा अमलात आणून लव जिहाद विरोधी कायद्याची अंमलबजावणी तातडीने केली जावी अशी मागणी त्यांनी केली. या प्रकरणामागील आरोपी शोधून त्यांची पाळेमुळे खणून काढावीत अशी मागणी यावेळी करण्यात येऊन जिल्हा प्रशासनाने निवेदन सादर करण्यात आले.

## दीपक देशमुखांच्या घरावर ईडीची धाड

**मायणी :** सातारा-करोना काळात मृत झालेल्या शेकडो रुग्णांना जिवंखत दाखवून त्या आधारे सरकारकडून कोट्यावधी रुपयांचे अनुदान लाटले असा आरोप करत मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल करणारे याचिकाकर्ते दीपक देशमुख व त्यांचे चुलत बंधू हिंमत देशमुख यांच्या घरावर 'ईडी'ने शुक्रवारी सकाळी धाड टाकली आहे.

ईडीच्या झोन-२ मुंबई कार्यालयातून हे अधिकारी सकाळी सात वाजता अचानक घरी धडकले. दोन उच्च अधिकारी व त्यांच्यासोबत २२ सीआरपीएफच्या जवाणांनी घरावर धाड टाकली आहे.

धक्कादायक बाब म्हणजे, दीपक देशमुख व त्यांचे चुलत बंधू हिंमत देशमुख हे घरातच नाहीत. घरात फक्त महिला, लहान मुले व दोन जेष्ठ नागरिक घरात आहेत. या महिला व लहान मुलांवर ईडीचे अधिकारी माहिती घेत आहेत.

देशमुख कुटुंबियांचे मायणी नजिकच्या शिंदेवाडी (ता.खटाव) येथे घर आहे. येथे ही सदर धाड टाकण्यात आली आहे. या घराशेजारीच देशमुख कुटुंबाची दुध डेअरी आहे. या डेअरीतील कर्मचाऱ्यायांना बोलावून ईडीचे अधिकारी चौकशी करीत असल्याचे देशमुख कुटुंबीयांच्या सूत्रांनी सांगितले.

देशमुख कुटुंबातील प्रमुख डॉ. एम. आर. देशमुख यांनी सामाजिक हेतूने मायणी येथे वैद्यकीय महाविदयालय सुरु केले आहे. हे महाविद्यालय माण -खटावचे भाजपाचे आमदार जयकुमार गोरे यांनी पाच वर्षांपूर्वी ताब्यात घेतले होते.

सर्वोच्च न्यायालयाने हे महाविद्यालय देशमुख कुटुंबियांच्या ताब्यात दिले. मात्र त्या अगोदर साधारण तीन वर्षे हे महाविद्यालय आमदार जयकुमार गोरे यांच्या ताब्यात होते. करोना काळात त्यांनी अनेक गैरप्रकार केले होते. पहिला गैरप्रकार त्यांनी एका दलित शेतकऱ्याच्या खोट्या सह्या करून त्याच्या शेतातून रस्ता काढला होता. त्यावरून जयकुमार गोरे यांच्यावर ट्रॅासिटीचा गुन्हा दाखल झाला होता. त्यावेळी मुंबई उच्च न्यायालयाने गोरे यांना अटक करण्याचे आदेश दिले होते. सर्वोच्च न्यायालयानेही गोरे यांना अटकपूर्व जामीन नाकारला होता. त्यानंतर गोरे यांना संरक्षण मिळाले होते.

महाविद्यालयाचे संस्थापक डॉ. एम.आर. देशमुख व त्यांचे भाऊ आप्पासाहेब देशमुख यांच्यावर ईडीने कारवाई केली होती. हे दोन्ही बंधू अजून तुरुंगातच आहेत. अशातच आता त्यांचा मुलगा व महाविद्यालयाचे उपाध्यक्ष डॉ. दीपक देशमुख यांनी जयकुमार गोरेचे करोनातील प्रकरण उच्च न्यायालयात दाखल केले.तेव्हापासून हे महाविद्यालय आणि हे प्रकरण पुन्हा चर्चेत आले आहे. या कारवाईतून काय माहिती उपलब्ध झाली याबाबत रात्री उशिरापर्यंत माहिती उपलब्ध झाले नव्हती.

## शासनाच्यावतीनं ऑगस्ट महिन्यात 'महसूल पंधरवडा' कार्यक्रमाचं आयोजन

**वडूज :** राज्य शासनाच्या वतीने दिनांक १ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट अखेर महसूल पंधरवडा कार्यक्रम आयोजन करण्यात आलं असून या उपक्रमाचा इच्छुक लाभार्थ्यांनी लाभ घेण्याचं आवाहन प्रांत अधिकारी उज्वला गाडेकर यांनी केलं आहे.

शासनाच्या या उपक्रमाबाबत वडूज तहसील कार्यालयात आयोजित नियोजन बैठकीत प्रांत अधिकारी उज्वला गाडेकर बोलत होत्या. यावेळी तहसीलदार बाई माने, तालुका आरोग्य अधिकारी, कृषी विभाग, शिक्षण विभाग, नायब तहसीलदार, सर्व मंडल अधिकारी, तलाठी, कर्मचारी विविध सामाजिक संघटना पदाधिकारी व पत्रकार उपस्थित होते.

.यामध्ये १ ऑगस्ट रोजी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना शुभारंभ, दिनांक २ रोजी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना, दिनांक ३ रोजी मुख्यमंत्री ज्येष्ठांसाठी तीर्थ क्षेत्र दर्शन योजना, दिनांक ४ रोजी स्वच्छ व सुंदर माझे कार्यालय उपक्रम, दिनांक ५ रोजी कृषीमार्गर्शन कार्यक्रम, दिनांक ६ रोजी शेती/पाऊस/ दाखले, दिनांक ७ रोजी युवासंवाद, दिनांक ८ रोजी महसुल जनसंवाद, दिनांक ९ रोजी महसूल ई प्रणाली, दिनांक १० रोजी सैनिक हो तुमच्यासाठी, दिनांक ११ रोजी आपती व्यवस्थापन मार्गदर्शन, दिनांक १२ रोजी एक हात मदतीचा दिव्यांगाच्या कल्याणासाठी, दिनांक

## 'लाडकी बहीण' योजनेपासून कोणीही वंचीत राहू नये : आ. शिवेंद्रसिंहराजे

### आढावा बैठकीत अधिकाऱ्यांना केल्या सूचना

**सातारा :** राज्य सरकारने माता- भगिनींसाठी 'लाडकी बहीण' योजना सुरु केली आहे. महिलांना आर्थिक आधार मिळावा म्हणून ही योजना राबवण्यात येत आहे. सातारा- जावली मतदारसंघातील कोणीही या योजनेपासून वंचीत राहू नये, याची खबरदारी प्रशासनाने घ्यावी अशा सूचना आ. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी संबंधित अधिकाऱ्यांना केल्या.

सातारा- जावली मतदारसंघात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ सर्व माता- भगिनींना मिळावा, या योजनेपासून पात्र एकही महिला वंचीत राहू नये यासंदर्भाने आ. शिवेंद्रसिंहराजेंनी सातारा नगर पालिका कार्यालयात या



योनजनेच्या अंमलबजावणीबाबत आढावा बैठक घेतली. या बैठकीत आ. शिवेंद्रसिंहराजे बोलत होते. बैठकीला प्रांताधिकारी सुधाकर भोसले, सातारचे तहसीलदार नागेश गायकवाड, जावलीचे तहसीलदार हणमंत कोळेकर, सातारा पंचायत समितीचे गट विकास अधिकारी सतीश बुद्धे, जावली पंचायत समितीचे गट विकास अधिकारी मनोज भोसले, सातारा पालिकेचे मुख्याधिकारी अभिजित बापट यांच्यासह सातारा पालिका, मेढा नगरपंचायत, सातारा व जावली तहसीलदार कार्यालय आणि सातारा व जावली पंचायत समितीमधील संबंधित सर्व अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

आ. शिवेंद्रसिंहराजे म्हणाले, सातारा- जावली मतदारसंघामध्ये दुर्गम, डोंगराळ भाग आहे. परळी, चाळकेवाडी, ठोसेघर, कास- बामणोली, करहर, केळघर आदी भागामध्ये अनेक गावे दुर्गम आहेत. अशा गावांमध्ये कनेक्टिव्हिटी नसल्याने योजनेचे अर्ज भरण्यासाठी तांत्रिक अडचणी निर्माण होत आहेत. अशा गावांमध्ये योजनेचे अर्ज भरून घेण्याची खबरदारी प्रशासनाने घ्यावी, त्यासाठी आवश्यक यंत्रणा पुरवावी. तसेच अशा गावांमध्ये योजनेपासून कोणी वंचीत राहिले नाही ना, याचाही सर्व्हे प्रशासनाने करावा. संपूर्ण मतदारसंघात या योनजेची अंमलबजावणी योग्य प्रकारे झाली पाहिजे. योजनेसाठी पात्र ठरणारी एकही महिला या योजनेपासून वंचीत राहू नये, यासाठी सर्व प्रकारची आवश्यक कागदपत्रे मिळण्यासाठी आणि अर्ज भरून घेण्यायासाठी सर्वत्र पुरेशी यंत्रणा उपलब्ध करून द्या, अशा सूचना आ. शिवेंद्रसिंहराजे यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना केल्या.